परिपत्रक

विषय :- महालेखाकार यांचे निरिक्षण अहवालातील विशेष शुल्क फीचे वसुलीबाबत.

क्रमांक एमडी- ११९२/आठ मुंबई, नोव्हेंबर, १९९२.

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांनी त्यांचे निरीक्षणामध्ये मुंबई दा. निषेध [ विशेष शुल्क फी ] नियम १९५४ [नियम-५]नुसार आकारावयाच्या विशेष शुल्क फी बद्दल काही आक्षेप घेतलेले आहेत. महालेखाकार यांनी त्यांचे आक्षेपात निर्देशित केलेले आहे की, एका अनुज्ञप्तीमधील दोन भागीदारापैकी एक भागीदार मृत्यू इतर कारणास्तव कमी झाल्याने त्याचप्रमाणे अनुज्ञप्ती एकाच नावाने होती त्यामध्ये एक अथवा अनेक भागीदारांचा समावेश केला गेल्यामुळे अनुज्ञप्तीचे भागीदारी संस्थेकडून मालकी हक्काकडे तसेच मालकी हक्काकडून भागीदारी संस्थेकडे बदल झाल्यामुळे अनुज्ञप्तीच्या मूळ घटनेत बदल झाल्याने नियम ५ प्रमाणे अनुज्ञप्ती फी एवढी वसुल करण्यात यावी.

महालेखाकार यांचे निरीक्षण अहवालात जरी भागीदारीच्या बदलामुळे अनुज्ञप्तीच्या घटनेत बदल झाला असा उल्लेख केला असला तरी आक्षेपापूर्वी अधिक्षकांनी मुंबई दारुबंदी [ विशेष शुल्क फी ] या नियम ६ नुसार अनुज्ञप्ती फी च्या निम्मे फी वसुल केलेली आहेत. अधिक्षकांनी पूर्वी केलेली कार्यवाही व महालेखाकार यांनी नियम ५ नुसार घेतलेले आक्षेप यामुळे काही अधिक्षकांना नियमासंबंधी संभ्रम निर्माण होऊन त्यांनी या कार्यालयास मार्गदर्शन मागितलेले आहे. अधिक्षकांच्या शंकेच्या संदर्भात कळविण्यात येते की अनुज्ञप्तीमध्ये जर एक भागीदार असेल व त्यामध्ये दुसऱ्या व्यक्तींचा समावेश केला गेला असेल तर अनुज्ञप्तीची घटना [ Entity ] ही मालकी हक्काकडून भागीदारी संस्थेकडे बदली जाते तसेच या उलट अनुज्ञप्ती भागीदारामध्ये असेल व त्यामधील भागीदार काही कारणास्तव कमी झाले असतील व त्यामध्ये एकच व्यक्ती मालक राहिली असेल तर अनुज्ञप्तीची घटना भागीदारी-कडून मालकी हक्काकडे बदलली गेली व या बदलासाठी मुंबई दारुबंदी निषेध नियम १९५४ [ विशेष शुल्क फी ] चा नियम ५ नुसार अनुज्ञप्ती फी एवढी म्हणजे १०० % फी वसुल करण्यात यावी हा महालेखाकार यांचा आक्षेप योग्य आहे.

यापुढे अनुज्ञप्तीचे भागीदारी संबंधात ज्यावेळेस अनुज्ञप्तीची घटना बदलेल त्यावेळेस नियम ५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

[ बलदेव चंद ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१] सर्व जिल्हाधिकारी यांना माहितीकरिता व कार्यवाहीकरिता